दर्जेदार मराठी चित्रपट निर्मितीस अर्थसहाय्य मंजूर करणेबाबत. सुधारीत योजना.

# महाराष्ट्र शासन
## पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
## शासन निर्णय क्रमांकः मचिअ-२०१२ / प्र.क्र.१४१ / सां.का.१

मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३० ऑक्टोबर, २०१३.

**वाचा -**

१) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक : मचिअ-२००४/प्र.क्र.३०५/सांका-१, दि.११ ऑक्टोबर, २००५.

२) शासन पत्र, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक: गोचिन २००५/प्र.क्र.२७४/सां.का.१, दि.८ मार्च, २००६.

३) शासन पत्र, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्रमांक: मचिअ २००६/प्र.क्र.१४७/सां.का.१, दि.२८ जुलै, २००६.

४) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्रमांक : मचिअ २००९/प्र.क्र.२१०/सां.का.१, दि.२० ऑगस्ट, २००९.

**प्रस्तावना -**

शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र.मचिअ-१०९६/प्र.क्र.४३४/सांका-२, दिनांक २७ नोव्हेंबर, १९९७ अन्वये दर्जेदार मराठी चित्रपट निर्मितीसाठी अर्थसहाय्य देण्याची योजना कार्यान्वित करण्यात आली. तद्नंतर वेळोवेळी कालपरत्वे योजनेत बदल करण्यात आले. प्रचलित योजना उपरोक्त शासन निर्णय व शासन पत्रांद्वारे देण्यात आलेल्या स्पष्टीकरणानुसार कार्यान्वित आहे. सदरहू प्रचलित योजनेमध्ये आता कालानुरुप बदल करणे आवश्यक झाले आहे. मराठी चित्रपट व्यवसायाचा विकास होण्यासाठी सर्वतोपरी सहाय्य करण्याबाबत शासनाचे धोरण नेहमीच अनुकूल व सहाय्यकारी राहीले आहे. त्यास अनुसरुन उपरोक्त सर्व शासन निर्णय व स्पष्टीकरणात्मक सुचना अधिक्रमित करुन सुधारित योजना अंमलात आणण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णय -**

दर्जेदार मराठी चित्रपट निर्मितीस प्रोत्साहन देण्यासाठी अर्थसहाय्य मंजुर करण्याबाबतच्या प्रचलित योजनेत सुधारणा करण्यासंदर्भात प्राप्त झालेल्या सर्व सुचनांचा साकल्याने विचार केल्यानंतर शासनाने उपरोक्त नमूद प्रचलित योजनेबाबतचे सर्व शासन निर्णय तसेच स्पष्टीकरणात्मक सूचना अधिक्रमित करुन पुढीलप्रमाणे सुधारीत योजना कार्यान्वित करण्याचा निर्णय घेतला आहे :-

१) सदर योजनेअंतर्गत द्यावयाचे अर्थसहाय्य या सोबतच्या **परिशिष्ट 'अ'** मध्ये नमूद केलेल्या तसेच खालील निकषांची पूर्तता करणाऱ्या मराठी चित्रपटास चित्रपट परिक्षण समितीने परिक्षणाअंती शिफारस केलेल्या दर्जानुसार अनुज्ञेय राहील.

अ) **'अ'** दर्जा प्राप्त चित्रपट रुपये ४०/- लाख **किंवा** चित्रपट निर्मितीचा प्रत्यक्ष खर्च यापैकी जी कमी असेल, ती रक्कम.

ब) **'ब'** दर्जा प्राप्त चित्रपट रुपये ३०/- लाख **किंवा** चित्रपट निर्मितीचा प्रत्यक्ष खर्च यापैकी जी कमी असेल, ती रक्कम; **आणि**

क) **'अपात्र'** दर्जा प्राप्त चित्रपटास कोणतेही अर्थसहाय्य अनुज्ञेय होणार नाही.

२) ही योजना महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५ यांच्या मार्फत राबविली जाईल.

३) या योजनेचा लाभ घेण्यास महाराष्ट्र राज्यात कायमचे वास्तव्य ( Domicile Certificate ) असणारा चित्रपट निर्माता पात्र असेल आणि हा लाभ त्यांनी निर्माण केलेल्या जास्तीत-जास्त **तीन** चित्रपटांना मिळू शकेल.

४) योजनेअंतर्गत अर्थसहाय्यासाठी अर्ज करणाऱ्या चित्रपट निर्मिती संस्थेचा प्रत्येक मालक / भागीदार यांना या प्रयोजनार्थ निर्माता समजले जाईल. सहकारी संस्था चित्रपट निर्मिती करीत असल्यास त्या संस्थेला निर्माते समजले जाईल व संस्थेच्या अध्यक्षांच्या नावाने सर्व कार्यवाही होईल. या प्रत्येक निर्मात्याचे महाराष्ट्रात किमान १५ वर्षे वास्तव्य असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

५) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५ यांचेकडून मराठी चित्रपट निर्मात्यास रु.१०००/- (रुपये हजार फक्त) किंवा वेळोवेळी शासन निश्चित करेल एवढे शुल्क जमा करुन अर्थसहाय्याचा विहीत नमुन्यातील अर्ज प्राप्त करता येईल. निर्मात्याने सदर अर्ज सर्व तपशिल, कागदपत्रांसह महामंडळाला सादर करणे आवश्यक राहील.

६) महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाने विहीत नमुन्यात प्राप्त झालेले अर्ज, चित्रपटाची कथा, पटकथा, संवादाची (मोठया अक्षरात, टंकलिखित करुन) प्रत, चित्रपटाची रिळ / व्हिसीडीज् / डिव्हीडीज्, चित्रपट प्रदर्शित केल्याबाबतची कागदपत्रे आणि चित्रपट निर्मितीचे सनदी लेखापालाने प्रमाणित केलेले Profit-Loss Account आणि Balance Sheet व इतर संबंधित कागदपत्रे इत्यादींची प्राथमिक छाननी करावी. महामंडळ छाननीअंती परिक्षण करण्यास पात्र ठरणारे चित्रपट परिक्षण समितीच्या परिक्षणार्थ ठेवेल.

७) चित्रपट परिक्षण समिती सदर चित्रपटाचे परिक्षण करुन अर्थसहाय्यासाठी विहीत **'अ'**, **'ब'** किंवा **'अपात्र'** अशी वर्गवारी निश्चित करील. चित्रपट परिक्षण समितीची कार्यपध्दती **परिशिष्ट 'ब'** प्रमाणे असेल.

८) चित्रपट परिक्षण समितीने परिक्षणाअंती निश्चित केलेला दर्जा अंतिम असेल. कोणत्याही चित्रपटाचे पुन:परिक्षण केले जाणार नाही. चित्रपट परिक्षण समितीने निश्चित केलेला दर्जा मान्य असल्याबाबत तसेच यासंदर्भात कोणतीही तक्रार केली जाणार नाही, असे विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र **(परिशिष्ट 'ड'**) अर्थसहाय्याच्या अर्जासोबत चित्रपट निर्मात्याने / निर्मिती संस्थेने सादर करणे बंधनकारक राहील.

९) चित्रपट परिक्षणाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर अर्थसहाय्याची शिफारस करुन निधी वितरणाचा प्रस्ताव महामंडळ शासनाला सादर करील. शासनाची मान्यता व निधी उपलब्ध झाल्यानंतर महामंडळ अर्थसहाय्याची रक्कम चित्रपट निर्मात्यांना वितरीत करील.

१०) अर्थसहाय्यासाठी सादर झालेल्या प्रत्येक चित्रपटाचे किमान रुपये १.०० लाख भाडे शुल्काएवढे चित्रीकरण महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५ किंवा कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ, कोल्हापूर येथे करणे बंधनकारक आहे. अन्यथा त्या चित्रपटाच्या अर्थसहाय्यातुन रुपये १.०० लाख एवढी रक्कम कपात केली जाईल. या प्रयोजनार्थ रक्कम कपात करुन उर्वरीत अर्थसहाय्याचा प्रस्ताव महामंडळ शासनाला सादर करील.

११) चित्रपट परिक्षण शुल्काप्रित्यर्थ रुपये ५ हजार व योजनेच्या अंमलबजावणीप्रित्यर्थ २ टक्के सेवाशुल्क एवढी रक्कम मंजूर केलेल्या अर्थसहाय्याच्या रकमेतुन महामंडळ वसूल करील. अनुक्रमांक १० व ११ येथील वजातीनंतर निव्वळ अर्थसहाय्याची रक्कम चित्रपट निर्माता / निर्मिती संस्थेला वितरीत केली जाईल.

१२) राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त मराठी चित्रपट, मराठी लघुपट व चित्रकर्मी यांचा रोख पुरस्कार देऊन शासनातर्फे गौरव केला जाईल. मात्र इतर भाषेतील रिमेक, डब किंवा सबटायटल मराठी चित्रपट पुरस्काराकरीता पात्र ठरणार नाहीत. रोख पुरस्काराची रक्कम शासन वेळोवेळी निश्चित करील व यासाठी निधी महामंडळाला उपलब्ध करुन देईल. मात्र सत्कार सोहळयाचे आयोजन व आयोजनाचा खर्च महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ स्वनिधीतून करील.

१३) **परिशिष्ट 'इ'** मध्ये नमूद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात उत्कृष्ट चित्रपटासाठी पुरस्कार प्राप्त न झालेल्या परंतु नामांकन प्राप्त करणाऱ्या तसेच पॅनोरामा सेक्शन मध्ये निवड झालेल्या मराठी चित्रपटांना शासनातर्फे प्रत्येकी रुपये १.०० लाखाचा पुरस्कार निर्माता व दिग्दर्शक यांना विभागून देण्यात येईल. अशा चित्रपटाच्या निर्मात्याने योग्य त्या प्रमाणपत्रांसह व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५ यांचेकडे अर्ज सादर करावा.

१४) या योजनेसाठी निधी वितरणाकरीता उप सचिव, सांस्कृतिक कार्य, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच कार्यासन अधिकारी, (रोख शाखा) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांना आहरण व संवितरण अधिकारी घोषित

करण्यात येत आहे. महामंडळाचा प्रस्ताव मान्य झाल्यानंतर अर्थसहाय्याचा एक रकमी धनादेश शासन महामंडळाच्या नावे वितरीत करील. वेळोवेळी शासनाने महामंडळाला दिलेल्या निधीमधील शिल्लक रक्कम वित्तीय वर्षाच्या अखेर महामंडळ शासनाकडे प्रत्यार्पित करील.

१५) या शासन निर्णयातील कोणत्याही नियमात बदल करणे, सुधारणा करणे किंवा अर्थ लावणे याबाबतचे पूर्ण अधिकार शासनास राहतील. याबाबत शासनाने दिलेले आदेश अंतिम आणि संबंधितांवर बंधनकारक राहतील.

१६) **दिनांक ०३.०५.२०१३** रोजी किंवा त्यानंतरच्या दिनांकास जे मराठी चित्रपट सेन्सॉर बोर्ड प्रमाणित होतील त्यांना या शासन निर्णयातील तरतुदी लागु होतील. यापूर्वी सेन्सॉर बोर्ड प्रमाणित होणारे मराठी चित्रपट जुन्या योजनेप्रमाणे अर्थसहाय्यास पात्र राहतील.

१७) या योजनेसाठी होणारा खर्च "मागणी क्रमांक झेडडी-२, २२०५ कला आणि संस्कृती, (०३) (०७) मराठी चित्रपट निर्मितीसाठी सहाय्यक अनुदान (२२०५ १५९९) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखालील तरतुदीतून भागविण्यात येईल.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ६१८/व्यय-१४ दि.२८.१०.२०१३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१३१०३०१६५४५०७६२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay Pandurang Bhokare

Digitally signed by Sanjay Pandurang Bhokare
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS, postalCode=400032, st=MAHARASHTRA, cn=Sanjay Pandurang Bhokare
Date: 2013.10.31 17:56:16 +05'30'

**संजय पां. भोकरे**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव.
४. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव.
५. मा. राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव.
६. मा. विधान मंडळ सदस्य - सर्व.

७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) एक, महाराष्ट्र, मुंबई.
८. महालेखापाल (लेखा परीक्षा) एक, महाराष्ट्र, मुंबई.
९. महालेखापाल (लेखा परीक्षा) तीन, महाराष्ट्र, मुंबई.
१०. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१२. सर्व विभागीय आयुक्त.
१३. सर्व जिल्हाधिकारी.
१४. महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१७. संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५.
१९. व्यवस्थापकीय संचालक, कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ, कोल्हापूर.
२०. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागातील सर्व कार्यासने, मंत्रालय, मुंबई.
२१. अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ, रवींद्र नाटयमंदिर, प्रभादेवी, मुंबई.
२२. निवड नस्ती, का. सांका.-१.

**परिशिष्ट 'अ'**

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,

शासन निर्णय क्र.मचिअ-२०१२ / प्र.क्र.१४१ / सां.का.१

दिनांक : ३० ऑक्टोबर, २०१३ चे सहपत्र

**दर्जेदार मराठी चित्रपट निर्मिती अर्थसहाय्य पात्रतेकरीता विहीत अटी, शर्ती व निकष**

१) अर्थसहाय्यासाठी अर्ज केलेला प्रत्येक मराठी चित्रपट भारतीय सेन्सॉर बोर्डाने प्रमाणित करणे बंधनकारक आहे.

२) इतर भाषेतील रिमेक, डब किंवा सबटायटल मराठी चित्रपट अर्थसहाय्याकरीता अपात्र ठरतील.

३) अर्जदार निर्मात्याने व निर्मिती संस्थेने अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे सदस्य असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

४) चित्रपट निर्मात्याचा फक्त एक चित्रपट दोन वर्षातून एकदाच अर्थसहाय्यास पात्र राहील. दोन वर्षाची गणना करताना आधीच्या व नंतरच्या चित्रपटांच्या सेन्सॉर बोर्ड प्रमाणपत्राचा दिनांक लक्षात घेतला जाईल. सदर दोन वर्ष अंतराची अट महाराष्ट्र राज्य पुरस्कार / राष्ट्रीय पुरस्कार / आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त चित्रपटांच्या बाबतीत लागू राहणार नाही. आंतरराष्ट्रीय पुरस्कार म्हणजे **परिशिष्ट 'इ'** मध्ये नमूद आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील पुरस्कार प्राप्त मराठी चित्रपट विचारात घेतले जातील.

५) चित्रपट निर्मात्याचे जास्तीत-जास्त तीन मराठी चित्रपट अर्थसहाय्याकरीता विचारात घेतले जातील. परंतु सदर अट महाराष्ट्र राज्य पुरस्कार / राष्ट्रीय पुरस्कार / आंतरराष्ट्रीय पुरस्कार **(परिशिष्ट 'इ'** मध्ये नमूद) प्राप्त चित्रपटांच्याबाबतीत लागू राहणार नाही.

*६) निर्मिती संस्था अथवा निर्माता समुह यात भागीदार असलेल्या कोणत्याही निर्मात्याने यापूर्वी तीन चित्रपटांसाठी अर्थसहाय्य स्विकारले असल्यास, अशा निर्मिती संस्थेचा किंवा निर्माता समुहाचा किंवा निर्मात्याचा चित्रपट अर्थसहाय्यासाठी अपात्र ठरेल. येथे यापूर्वीच्या योजनेनुसार अर्थसहाय्य स्विकारलेले चित्रपट देखील गणनेत अंतर्भुत केले जातील. वरील अट क्रमांक ४ व ५ ची पूर्तता प्रत्येक भागीदार निर्मात्याला करावी लागेल.*

७) सदरची योजना फक्त पूर्ण लांबीच्या ( Feature Film ) मराठी चित्रपटास लागू राहील. चित्रपट निगेटिव्हवर चित्रीत केलेले चित्रपट, तसेच डिजिटल कॅमेऱ्याचा वापर करुन कमीत-कमी २ K Resolution मध्ये चित्रीत व महाराष्ट्र राज्यातील संस्थेकडुन D.I. ( Digital Intermediate ) केलेले चित्रपट या योजने अंतर्गत अर्थसहाय्यासाठी पात्र ठरतील. तथापि, चित्रपट निर्मितीचे तांत्रिक स्वरुप निरंतर बदलत असल्यामुळे विविध डिजिटल स्वरुपाच्या (२ K Resolution व्यतिरिक्त) तंत्राचा वापर करुन जर एखादया निर्मात्याने वा निर्मिती संस्थेने चित्रपट निर्माण केला व त्यास चित्रपट परिक्षण समितीने अन्य निकषांच्या आधारे **'अ'** किंवा **'ब'** दर्जा देऊन अर्थसहाय्यास पात्र ठरविले तर, गुणवत्तेच्या आधारे अशा चित्रपटांना अर्थसहाय्य देण्याबाबत शासन उचित निर्णय घेईल.

८) चित्रपट निर्मात्याने राज्याच्या प्रत्येक (सहा) महसूली विभागात एक आठवडयाकरीता व राज्यात एकूण दहा आठवडे चित्रपट प्रदर्शित करणे बंधनकारक आहे. चित्रपट प्रसिध्दीचा पुरावा म्हणुन स्थानिक वृत्तपत्रातील जाहिराती, चित्रपटगृहांचे प्रदर्शन प्रमाणपत्र, आठवडयाभराचे दैनिक जमा अहवाल ( Daily Collection Report ) व संबंधित जिल्हयाच्या शासकीय करमणूक कर अधिकारी यांचे प्रमाणपत्र इत्यादींची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

९) चित्रपट सेन्सॉर प्रमाणित झाल्यानंतर त्याचा योजनेनुसार दर्जा जाणून घ्यावयाचा असल्यास निर्माता त्यासाठी देखील अर्ज करु शकतील. हा अर्ज करताना प्रदर्शनाशी संबंधित अटी व शर्ती वगळता अन्य सर्व अटींची पूर्तता करावी लागेल. मात्र अर्थसहाय्याची मागणी करण्यासाठी योजनेनुसार विहित सर्व अटींची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

१०) अर्थसहाय्यासाठी आलेल्या सर्व अर्जांची छाननी महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाने करावी आणि निकषात पूर्णपणे बसणारे अर्ज आणि निर्मात्यांनी सादर केलेला चित्रपटाची कथा, पटकथा, संवादाची (मोठया अक्षरात, टंकलिखित करुन) प्रत आणि त्याबाबतची रिळे / व्हिसीडीज् / डिव्हीडीज् इत्यादी शासनाने गठीत केलेल्या चित्रपट परिक्षण समितीपुढे सादर करावे. या रिळे / व्हिसीडीज् / डिव्हीडीज् इत्यादीचे परिक्षण करण्याची व्यवस्था व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ (मर्या.), दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०० ०६५ यांनी करावी.

११) चित्रपट निर्मितीच्या खर्चामध्ये पुढील बाबींचा अंतर्भाव असेल :

१) कथा, पटकथा आणि संवाद.
२) गीत लेखन.
३) निर्मिती व प्रकाशन.
४) कलाकार मानधन.
५) संगीत (पार्श्वसंगीतासहीत).
६) कला दिग्दर्शन - सेटस्, डिझाईन व निर्मिती या वरील खर्च.
७) चित्रपट व प्रयोगशाळा यावरील खर्च.
८) स्टुडिओ भाडे.
९) वीज.
१०) मेकअप, प्रसाधन सामुग्री व आभुषणे.
११) संकलन (एडिटींग).
१२) रेकॉर्डींग व पुन्हा रेकॉर्डिंग (रिरेकॉर्डिंग).
१३) विमा.
१४) सेन्सॉर खर्च.
१५) अन्य चित्रपट निर्मितीच्या वरील बाबीमध्ये समाविष्ट न होऊ शकणाऱ्या बाबी.
१६) जाहिरातीवरील खर्च.
१७) वाहतुक, प्रवास व लोकेशनवर होणाऱ्या अनुषंगिक खर्च.

१२) चित्रपट निर्माता यांनी रुपये २००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड केलेले **परिशिष्ट 'ड'** प्रमाणे शपथपत्र सादर करावे.

*******

**परिशिष्ट 'ब'**

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,

शासन निर्णय क्र.मचिअ-२०१२ / प्र.क्र.१४१ / सां.का.१

दिनांक : ३० ऑक्टोबर, २०१३ चे सहपत्र

## चित्रपट परिक्षण समितीची कार्यपध्दती

चित्रपट परिक्षण समिती सदस्यांनी चित्रपटाचा दर्जा ठरविताना, चित्रपटाच्या पुढील बाबींना अनुलक्षून गुणांकन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | बाब | गुण |
|---|---|---|
| १ | कथा / पटकथा / संवाद | २० |
| २ | दिग्दर्शन | १० |
| ३ | गीत / संगीत | १० |
| ४ | संकलन | १० |
| ५ | छायाचित्रण | १० |
| ६ | वेशभूषा / केशभूषा | ०५ |
| ७ | कला दिग्दर्शन | १० |
| ८ | ध्वनी तसेच इतर तांत्रिक कामगिरी | ०५ |
| ९ | अभिनय | १० |
| १० | चित्रपटाचा एकूण परिणाम | १० |

ज्या चित्रपटास ५१ ते ६९ गुण मिळतील त्यास **'ब'** आणि ७० च्या पुढे गुण मिळतील त्यास **'अ'** दर्जा दिला जाईल. ज्या चित्रपटास ५० किंवा त्यापेक्षा कमी गुण मिळतील तो चित्रपट अर्थसहाय्यास **अपात्र** ठरेल.

परिक्षण करणाऱ्या प्रत्येक सदस्याने महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ विहीत करेल त्या प्रपत्रात चित्रपटाच्या प्रत्येक बाबींबाबत एका परिच्छेदामध्ये आपले निरिक्षण व मत नोंदवावे व त्या आधारे गुण द्यावेत. हे निरिक्षण परिक्षकांनी आपल्या हस्ताक्षरात पुरेशा विस्तृत प्रमाणात नोंदवणे आवश्यक आहे. सर्व परिक्षकांनी नोंदविलेले निरीक्षण व गुणांचे एकत्रीकरण करुन सरासरीच्या आधारे चित्रपटाचा दर्जा सह व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी

आणि सांस्कृतिक विकास महामंडळ निश्चित करतील. व्यवस्थापकीय संचालक त्यावर प्रती स्वाक्षरी करुन अंतिम मान्यता देतील.

महाराष्ट्र राज्य पुरस्कार / राष्ट्रीय पुरस्कार / आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त चित्रपटांना कोणत्याही परिक्षणाशिवाय आपोआपच **'अ'** दर्जा बहाल होईल व अन्य अटींची पूर्तता होत असल्यास त्यास **'अ'** दर्जा प्रमाणे अर्थसहाय्य लागू होईल.

*******

**परिशिष्ट -'क'**

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
शासन निर्णय क्र.मचिअ-२०१२ / प्र.क्र.१४१ / सां.का.१
दिनांक : ३० ऑक्टोबर, २०१३ चे सहपत्र

## मराठी चित्रपट निर्मात्यांनी अनुदानाकरीता करावयाचा विहित नमून्यातील अर्ज

प्रति,
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ,
दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व),
मुंबई - ४०० ०६५.

महोदय / महोदया,

मी / आम्ही ------------------------------------------ या मराठी चित्रपटाच्या निर्मितीसाठी अर्थसहाय्य मिळण्याकरीता अर्ज करीत आहे / आहोत.

१) अर्जदार निर्मात्याचे संपूर्ण नांव : ------------------------------------------------

२) अर्जदाराचा पत्ता व : ------------------------------------------------
दूरध्वनी / फॅक्स क्रमांक / ------------------------------------------------
ईमेल पत्ता ------------------------------------------------
------------------------------------------------

( अर्जदार जर भागीदारी संस्था असेल तर सर्व भागीदारांची नांवे, पत्ते आणि दूरध्वनी क्रमांक यांची यादी स्वतंत्रपणे जोडावीत. जर चित्रपट संस्था ही सहकारी संस्था असेल तर अध्यक्ष आणि कार्यकारी / व्यवस्थापकीय संचालक तसेच संचालक मंडळाच्या सर्व सभासदांची नावे, पत्ते व दूरध्वनी यांची यादी देणे बंधनकारक राहील. तसेच जर ही संस्था उपरोक्त व्यतिरिक्त कोणत्याही वेगळया प्रकारची संस्था असेल तर अशा संस्थेच्या संचालक मंडळावरील अध्यक्षांसह सर्व सभासदांची नावे, पत्ते व दूरध्वनी यांची यादी देणे बंधनकारक राहील.)

३) चित्रपट निर्माता / निर्मिती संस्थेचे नांव आणि पत्ता : ------------------------------------
दूरध्वनी क्रमांक / फॅक्स क्रमांक / ईमेल पत्ता ------------------------------------

४) अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी आहे काय ? : आहे / नाही
असल्यास, त्याचा दाखला जोडला आहे काय ? : जोडला आहे / नाही.

५) चित्रपटाच्या दिग्दर्शकाचे नाव : ------------------------------------

६) चित्रपटाच्या संगीत-दिग्दर्शकाचे नाव : ------------------------------------

७) चित्रपटातील कलाकारांची नावे -

अ) नायक : ------------------------------------
ब) नायिका : ------------------------------------
क) सहनायक : ------------------------------------
ड) सह नायिका : ------------------------------------
इ) इतर कलाकार : ------------------------------------

८) चित्रपटाची लांबी : ------------- मीटर्स, ----------- रिळ

९) चित्रपट निर्मितीसाठी आलेला खर्च त्यासाठी कशाप्रकारे भांडवल उभारणी केली आहे ? : रुपये ----------

: i) स्वत:चे भांडवल : रुपये ----------
: ii) वित्तीय संस्थेकडून मिळालेले कर्ज : रुपये -----------
: iii) अन्य संस्थेकडून मिळालेले सहाय्य : रुपये -----------
एकूण : रुपये -----------

१०) तांत्रिक बाबींच्या पूर्ततेबाबत पुढील मुद्दांवर माहिती द्यावी :

अ) डिजिटल सराऊंड साऊंड (डॉल्बी / डि.टी.एस.इ.) चा वापर केला आहे काय ? : होय / नाही
(याबाबतचे ज्या संस्थेत ही प्रक्रिया करण्यात आली त्या संस्थेचे प्रमाणपत्र आणि ज्या प्रकारच्या डिजिटल सराऊंड साऊंड चा वापर केलेला आहे त्या संबंधिच्या करारपत्राची प्रत यासोबत जोडणे आवश्यक आहे)

ब) डिजिटल कॅमेराचा वापर केला आहे का? : होय / नाही
२ K Resolution आहे का ? : होय / नाही
D.I. ( Digital Intermediate ) केलेल्या संस्थेचे नाव : ---------------
('अ'आणि 'ब'बाबतचे संबंधित प्रयोगशाळेचे प्रमाणपत्र यासोबत जोडणे आवश्यक आहे.)

११) चित्रनगरी, गोरेगाव व कोल्हापूर चित्रनगरी येथील सोयी सुविधेचा वापर केला आहे काय ? असल्यास, किती रकमेपर्यंत. : होय / नाही
: ---------------

(संबंधित देयकाच्या छायांकित प्रती जोडाव्यात)

१२) इतर माहिती :

१३) अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे/प्रमाणपत्रे : (१)

: (२)

: (३)

: (४)

: (५)

: (६)

: (७)

: (८)

१४) सहपत्रांची एकूण संख्या : ---------------

प्रमाणित करण्यात येते की, वर नमूद केलेली सर्व माहिती संपूर्णपणे खरी आहे. तसेच शासनाच्या आदेश क्र.मचिअ-२०१२ / प्र.क्र.१४१ / सांका-१ दिनांक ३० ऑक्टोबर, २०१३ मधील सर्व अटी / शर्तींचे पालन करण्याची मी हमी देत आहे. यापैकी एक किंवा जास्त अटी / शर्तींचे माझ्याकडून / निर्मिती संस्थेकडून उल्लंघन झाल्यास त्याची जबाबदारी संपूर्णपणे माझी राहील आणि त्यासंदर्भात शासनाने ठरविलेल्या अंतिम कारवाईस मी पात्र राहीन.

चित्रपट परिक्षण समितीने माझ्या चित्रपटास दिलेल्या दर्जाच्या अनुषंगाने शासनाने घेतलेला अंतिम निर्णय माझ्यावर बंधनकारक राहील, व त्यावर अपील करण्याची मुभा मला राहणार नाही ही बाब मला मान्य आहे.

आपला / आपली विश्वासू,

( )

निर्माता / निर्माती

संस्थेचा रबर स्टॅम्प

ठिकाण :

दिनांक :

**परिशिष्ट 'क'चे प्रपत्र**

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
शासन निर्णय क्र.मचिअ-२०१२ / प्र.क्र.१४१ / सां.का.१
दिनांक : ३० ऑक्टोबर, २०१३ चे सहपत्र

**अर्जासोबत सादर करावयाच्या कागदपत्रांची / प्रमाणपत्रांची यादी.**

⇨ चित्रपटाच्या निर्मिती खर्चाचे सनदी लेखापालाने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र, Profit-Loss Account आणि Balance Sheet व इतर संबंधित कागदपत्रे.

⇨ चित्रपटाचे सेन्सॉर प्रमाणपत्र (२० प्रतीत).

⇨ अर्जदार अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचा सभासद असल्याचा पुरावा.

⇨ चित्रपटाचे लॅब प्रोसेसिंग प्रमाणपत्र.

⇨ डिजिटल कॅमेऱ्यावरील चित्रपट २ K Resolution मध्ये असल्याच्या समर्थनार्थ चित्रपट हा महाराष्ट्रातच D.I. करुन घेण्यात आलेल्या संस्थेचे [उदा. Prime Focus, Pixon, Prasad Lab, Film Lab, Reliance Media Works, Avitel & Gourav Digital इत्यादी] प्रमाणपत्र.

⇨ महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचा पुरावा. ( Domicile Certificate )

⇨ राज्याच्या सहा महसूल विभागामधील प्रत्येकी एक आठवडा परंतु राज्यात एकूण १० आठवडे चित्रपटगृहात चित्रपट प्रदर्शित झाल्याचे प्रमाणपत्र, Daily Collection Report, संबंधित जिल्हयाच्या शासकीय करमणूक कर अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.

⇨ चित्रपट प्रसिध्दीचा पुरावा म्हणून चित्रपट प्रदर्शित झाल्याचे दर्शविणारे फोटो.

⇨ जाहिरातीचे पेपर कात्रण.

⇨ चित्रपटाचे २० बुकलेट.

⇨ अर्थसहाय्य अनुदानासाठी प्रस्तावित चित्रपटात डिजिटल सराऊंड साऊंड (डॉल्बी / डि.टी.एस.इ.) चा वापर केला असल्यास ज्या संस्थेत ही प्रक्रिया करण्यात आली त्या संस्थेचे याबाबतचे चित्रपट पूर्ण झाल्यानंतर दिलेले प्रमाणपत्र आणि ज्या प्रकारच्या डिजिटल सराऊंड साऊंड चा वापर केलेला आहे त्या संबंधिच्या करारपत्राची प्रत.

⇨ परिक्षणाकरीता चित्रपटाची रिळ (प्रिंटस) / व्हिसीडीज् / डिव्हीडीज्.

⇨ रु.२००/च्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज केलेले शपथपत्र.

*******

**परिशिष्ट 'ड'**
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
शासन निर्णय क्र.मचिअ-२०१२ / प्र.क्र.१४१ / सां.का.१
दिनांक : ३० ऑक्टोबर, २०१३ चे सहपत्र

**शपथपत्र**

मी / आम्ही -------------------, निर्माता, मे.------------- या संस्थेचा प्रोपायटर / भागीदार / व्यवस्थापकीय संचालक /अधिकृत प्रतिनिधी असून, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचा शासन निर्णय क्रमांक : मचिअ-२०१२ / प्र.क्र.१४१ / सां.का.१, दि. ३० ऑक्टोबर, २०१३ नुसार ------------------------ या चित्रपटासाठी अर्थसहाय्य मिळावे म्हणून अर्ज करीत आहे. मला / आम्हाला शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती मान्य असून त्यातील अटी व शर्तीचे पालन करण्याची मी / आम्ही हमी देत आहे / आहोत. यापैकी कुठल्याही अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी माझी / आमची राहील.

शासनाने या योजनेच्या प्रयोजनार्थ गठित केलेल्या चित्रपट परिक्षण समितीने माझ्या / आमच्या चित्रपटाकरीता दिलेल्या दर्जाच्या अनुषंगाने शासनाने घेतलेला अंतीम निर्णय माझ्या / आमच्या वर बंधनकारक राहील व त्यावर अपील करण्याची मुभा मला / आम्हाला राहणार नाही ही बाब मला / आम्हाला मान्य आहे.

सदर अर्थसहाय्य मला / आम्हाला प्राप्त झाल्यावर जर कोणा त्रयस्थ व्यक्तीने कोणताही आक्षेप घेतला तर त्याचे पूर्ण निराकरण मी / आम्ही स्वत:चे जबाबदारीवर व स्वत:च्या खर्चाने करु, शिवाय अशा आक्षेपामुळे शासनास / महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्या., गोरेगांव यांना जर काही आर्थिक नुकसान अथवा खर्च करावा / सोसावा लागला तर त्याची तात्काळ परतफेड करण्याचे मी / आम्ही मान्य करीत आहे /आहोत.

मी / आम्ही दिलेली माहिती पूर्णत: सत्य असून त्यातील काही माहिती असत्य आढळल्यास मी / आम्ही कायदेशीर कारवाईस पात्र राहीन / राहू. मी / आम्ही दिलेली कोणतीही असत्य माहितीच्या आधारे या योजने अंतर्गत अर्थसहाय्य प्राप्त केल्यास सदर रक्कम मी / आम्ही शासनास परत करण्याची हमी देतो.

सदरचे शपथपत्र आज दिनांक ----------------- रोजी मुंबई येथे करुन देण्यात येत आहे.

स्वाक्षरी

( नाव )

संस्थेचा रबरी शिक्का

नोटरी

**परिशिष्ट 'इ'**

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,

शासन निर्णय क्र.मचिअ-२०१२ / प्र.क्र.१४१ / सां.का.१

दिनांक : ३० ऑक्टोबर, २०१३ चे सहपत्र

**योजनेच्या लाभांसाठी मराठी चित्रपटांना नामांकन अथवा पुरस्काराकरीता मान्य करण्यात आलेले आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव**

१) इंटरनॅशनल फिल्म फेस्टीवल ऑफ इंडिया, गोवा

२) ऑस्कर अॅकॅडमी अवॉर्डर्स, अमेरिका

३) कान्स फिल्म फेस्टीवल, फ्रान्स

४) बर्लीन इंटरनॅशनल फिल्म फेस्टीवल, जर्मनी

५) मॉस्को इंटरनॅशनल फिल्म फेस्टीवल, रशिया

६) व्हेनिस इंटरनॅशनल फिल्म फेस्टीवल, इटली

७) टोरान्टो इंटरनॅशनल फिल्म फेस्टीवल, कॅनडा

८) बुसान (पुसान) इंटरनॅशनल फिल्म फेस्टीवल, दक्षिण कोरिया

९) हाँगकाँग इंटरनॅशनल फिल्म फेस्टीवल, चीन

१०) मॅनहॅम इंटरनॅशनल फिल्म फेस्टीवल, जर्मनी

११) रॉटरडॅम इंटरनॅशनल फिल्म फेस्टीवल, नेदरलँड

*******